केंद्र शासनाच्या "श्रेयस" या शिकाऊ प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या शिकाऊ भत्याच्या (Stipend) खर्चास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
शासन निर्णय क्रमांक टिडीएस - २०२१/०५/प्र.क्र.३५०/ पर्यटन-४
दिनांक : १४ जुलै, २०२६.

संदर्भ : १) विधि व न्याय विभाग, अधिसूचना, दिनांक ०९/०२/२०१८.
२) सचिव, केंद्रीय मानव संसाधन विकास (उच्च शिक्षण) यांचे पत्र क्र. ३६-३५/२०१८-NVSQ, दि.१३/०२/२०१९.
३) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.१४९ /विशि-२, दिनांक १८/०२/२०१९.
४) केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची दिनांक २५/०९/२०१९ ची अधिसूचना.
५) शासन पत्र क्र. टिडीएस २०२१/०५/प्र.क्र.३५०/पर्यटन, दि.६/०७/२०२१.
६) सन निर्णय क्रमांक टिडीएस - २०२१/०५/प्र.क्र.३५०/ पर्यटन, दि.३०/०८/२०२२
७) संचालक, पर्यटन संचालनालय यांचे पत्र क्र. प.सं./आस्थापना/आस्थापना/श्रेयस १८८/२०२६/E-३०२७०८१, दि. १६/०६/२०२६.

<u>प्रस्तावना</u> : केंद्र सरकारच्या "श्रेयस" या योजनेअंतर्गत पर्यटन संचालनालयाच्या मुख्य कार्यालयामध्ये व प्रादेशिक कार्यालयांमध्ये पदवीधर व पदविकाधारक उमेदवार १० महिन्यांच्या कालावधीसाठी प्रत्येकी प्रतिमहा रुपये ९,०००/- वेतनावर घेण्यास संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पर्यटन संचालनालयाने "श्रेयस" योजनेच्या पोर्टलवरील नियमाप्रमाणे निवड प्रक्रिया राबवून पर्यटन संचालनालयाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयासासाठी व ६ विभागीय कार्यालयांसाठी मुलाखतीद्वारे पात्रता निकषांनुसार एकूण १८ शिकाऊ उमेदवारांच्या अनुक्रमे प्रतिमहा रुपये ९,०००/- व रुपये ८,०००/- या शिकाऊ भत्ता (Stipend) तत्त्वावर निवड करण्यात आली आहे. या उमेदवारांच्या शिकाऊ भत्याच्या (Stipend) पोटी सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ करीता अंदाजित खर्च रुपये ५२,६५,०००/- इतक्या खर्चास मान्यता देण्याची संदर्भ क्रमांक ७ येथील पत्रान्वये पर्यटन संचालनालयाने विनंती केली आहे.

शासन निर्णय :

पर्यटन संचालनालयाने संदर्भ क्रमांक ७ येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार केंद्र सरकारच्या “श्रेयस” या योजनेअंतर्गत पर्यटन संचालनालयाच्या मुख्य कार्यालयामध्ये व प्रादेशिक कार्यालयांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या एकूण १८ पैकी ०५ उमेदवारांना मुदतवाढ देण्यास आणि रिक्त पदावर १३ नवीन उमेदवारांच्या नियुक्तीस तसेच त्यांच्या छात्रवृत्तीसाठी (Stipend) **सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ करीता अंदाजित खर्च रुपये ५२,६५,०००/- (अक्षरी. रु. बावन्न लाख पासष्ठ हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.**

०२. उपरोक्त नमूद करण्यात आलेला खर्च भागविताना संदर्भ क्रमांक १ ते ३ व संदर्भ क्रमांक ४ येथील अधिसूचना / पत्रामधील सूचनांचे / तरतुदींचे आणि वित्तीय नियमांचे / विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई यांची राहील. या संदर्भात संदर्भ क्रमांक १ ते ३ व संदर्भ क्रमांक ४ येथील अधिसूचना / पत्रामधील सूचनांनुसार / तरतुदींनुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

०३. कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई यांची राहील व जादा खर्चाप्रित्यर्थ जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

०४. वर नमूद करण्यात आलेला खर्च हा सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ या वर्षांकरीता मुख्यलेखाशीर्ष "मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, ८०, सर्वसाधारण ००१, संचालन व प्रशासन (०१) पर्यटन संचालनालय (०१)(०१) पर्यटन संचालनालय (कार्यक्रम) (३४५२ २९७२), १०-कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा. मंजूर करण्यात आलेली रक्कम आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता मुख्य लेखा अधिकारी, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना -आहरण व संवितरण अधिकारी॰ व संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

मुंबई यांना -नियंत्रक अधिकारी घोषित करण्यात येत आहे. सदर निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेली रक्कम त्यांनी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई / संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी येथे देयके सादर करुन संबंधितांना वितरीत करावी. सदर कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास एक महिन्यात सादर करण्यात यावा.

०५. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र..४३/अर्थ-३, दिनांक ०४.०४.२०२२ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार व अधिकाराच्या मर्यादेत सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत असून सदर शासन परिपत्रकामधील प्रत्येक अटींची पूर्तता करण्यात आली आहे. तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र..४३/अर्थ-३, दि.०४.०४.२०२२ च्या परिशिष्टामधील तपासणीसूची बाबींची पूर्तता करण्यात आली आहे.

०६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५१७/व्यय-१५, दिनांक २९.०८.२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१४१७३७५०३६५० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VIJAY KRISHNAJI POWAR
Date: 2026.07.14 17:39:24 +05'30'

(विजय पोवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
४. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७. मुख्य लेखा अधिकारी, पर्यटन संचालनालय, मुंबई

८. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.

९. वित्त विभाग (का.व्यय-१५/अर्थोपाय / अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.

१०.अवर सचिव, (अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक विभाग,मंत्रालय, मुंबई

११.निवड नस्ती (पर्यटन-४)

***